महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ :** मा.सं./जनसंपर्क/वृत्तपत्र टिप्पणी/

## वृत्तपत्र टिप्पणी

## महानिर्मितीच्या तिल्लारीनगर विद्युत केंद्राची यशोगाथा
## माफक खर्चात स्थापित क्षमतेत ६ मेगावॅटने वाढ

**मुंबई (दि. २३/०१/२०१४) :**

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीकडून संचलित करण्यात येत असलेल्या तिल्लारी जल विद्युत केंद्राने नुकतीच एक लक्षणीय कामगिरी बजावली असून काही तांत्रिक सुधारणा साध्य करून या जल विद्युत केंद्राच्या स्थापित क्षमतेमध्ये ६ मेगावॅटने वाढ केली आहे. या तांत्रिकी सुधारणेअंतर्गत तेथील टर्बाईनमध्ये रनर नुकताच यशस्वीपणे बदलण्यात आला. सदर रनर बदलल्यामुळे या विद्युत केंद्राची स्थापित क्षमता आता ६० मेगावॅटवरुन ६६ मेगावॅट इतकी झाली आहे. एकीकडे कोणत्याही प्रकारच्या वीजनिर्मिती प्रकल्प उभारणीसाठी प्रति मेगावॅट सरासरी सुमारे रु. ७ कोटी इतका खर्च येत असतो. तथापि, तिल्लारी जल विद्युत केंद्राने केवळ एकूण सुमारे रु. २.४० कोटी इतक्या माफक खर्चात ६ मेगावॅटची क्षमतावाढ साध्य केली आहे. अशाप्रकारे अंदाजे ४० कोटी रुपयांची अप्रत्यक्ष बचत साध्य केली आहे. महानिर्मितीच्या या जल विद्युत केंद्राने बजावलेल्या या कामगिरीबद्दल मा. व्यवस्थापकीय संचालक व सर्व संचालक यांनी सर्व संबंधित अभियंता-तंत्रज्ञांचे कौतुक केले आहे.

तिल्लारी येथील या टर्बाईनचा जुना रनर स्वीस कंपनीने १९८६ साली बसविला होता. नवीन रन मेसर्स. अँडीज हायड्रो, दिल्ली या भारतीय कंपनीने बनविला आहे. सदर रनर महानिर्मिती कंपनीच्या तिल्लारी जल विद्युत केंद्राच्या अभियंता व कर्मचारी यांच्या पथकाने अथक परिश्रम घेऊन कमीत कमी वेळात बदलला आहे. सदर कामगिरीमुळे आगामी काळात शिखरमागणीच्या वेळी तसेच अतिवृष्टी प्रसंगी ओव्हरफ्लो होत असताना वाढीव वीजनिर्मिती साध्य होणार आहे.

या कामासाठी मुख्य अभियंता (जल) श्री. सोनकुसळे, पुणे जल विद्युत मंडळाचे अधीक्षक अभियंता श्री. सी.बी. बाबर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. सदर काम श्री. आर.ए. कुलकर्णी – कार्यकारी अभियंता, तिल्लारी यांच्या अधिपत्याखाली पूर्ण करण्यात आले. सदर कामाचे कुशल नेतृत्व उप कार्यकारी अभियंता श्री. एस.बी. देशपांडे व श्री. आर.एस. नाईक यांनी केले.

---

दिनांक : २३/०१/२०१४.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत / वाहिनीवर प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**